सं.फौ.ख.क्र.८३९७/२०२६

सरकार वि. गणेश

**नि.क्र. ७ लगत.**

<u>**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :–**</u>

<u>नाव</u> : सौरभ सविंद्र भगत,

<u>वय</u> : २६ वर्ष, <u>कामधंदा</u> : शेती,

<u>राहणार</u> : हुडकेश्वर खुर्द,नागपूर.

<u>**सरतपास सरकारी वकिल श्रीमती मेघा बुरंगे यांच्याकडून सूरू**</u> **:–**

१. घटना एक वर्षा पुर्वी दुबेनगर, हुडकेश्वर येथे दुपारी ११.०० ते १२.०० वाजणेच्या सुमारास घडली होती. त्यादिवशी मी इलेक्ट्रीक बील भरण्यासाठी दुबेनगर येथील स्टेट बँकेच्या पाठीमागे असलेल्या इलेक्ट्रीक बील भरणा केंद्राकडे माझे स्पलेंडर मोटरसायकलवरून जात होतो. त्यावेळी माझ्या पाठीमागून एक चारचाकी गाडी आली व त्या गाडीने मला ठोकर मारली. त्यानंतर ती चार चाकी गाडी तेथून निघून गेली. मला गाडीने ठोकर मारल्यामुळे माझ्या डाव्या पायाचे हाड तुटले. त्यानंतर मी माझ्या काकांना अपघाताबाबत सांगितले. मला उपचाराकरीता ओरा हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आले. पोलीसांनी दवाखान्यामध्ये माझा बयान नोंदवला. आता मला माझा पोलीसांनी घेतलेला बयान दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला आठवत नाही. सहीस <u>**नि.क्र.८**</u> देण्यात येते. त्यानंतर माझा हॉस्पीटलमध्ये उपचार करण्यात आला. हॉस्पीटलमधून एक आठवडयाने मला डिस्चार्ज देण्यात आला. पोलीसांनी माझा पुन्हा बयान घेतल्याचे मला आठवत नाही. आता मला दि.२३.०६.२०२५ रोजीचा पोलीसांनी घेतलेला बयान दाखविला. त्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला आठवत नाही. सहीस <u>**नि.क्र.९**</u> देण्यात येते.

<u>(सदरील साक्षीदाराने अभियोग पक्षाला पाठींबा दिला नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४(१) प्रमाणे सदरील साक्षीदाराला विरुध्द पक्षकार उलट तपासणीमध्ये जे कोणतेही प्रश्न विचारु शकेल ते प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली</u>)

२. आता मला माझे पोलीसांनी दि.१३.०६.२०२५ रोजी घेतलेल्या बयानातील अधोरेखीत भाग–अ मधील मजकूर दाखविला तो मजकूर मी पोलीसांना सांगितलेला नव्हता.

पोलीसांनी तो मजकूर माझ्या बयाना मध्ये तसा का नमुद केला याबददल मला काही माहित नाही. आता मला माझे पोलीसांनी दि.२३.०६.२०२५ रोजी घेतलेल्या बयानातील अधोरेखीत भाग–अ मधील मजकूर दाखविला तो मजकूर मी पोलीसांना सांगितलेला नव्हता. पोलीसांनी तो मजकूर माझ्या बयाना मध्ये तसा का नमुद केला याबददल मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीसोबत चांगले संबंध असल्यामुळे व आरोपी कडून मला नुकसान भरपाई मिळाली असल्याने मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीचे वकिल श्री. कैलास राठोड यांच्याकडून सूरू–**

३. माझी आरोपीविरुध्द काहीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला हुंडाई एमएच–३१–जीए–१३५८ या गाडीने धडक दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताशी आरोपीचा काहीही सबंध नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणौत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

VIJAYKUMAR JAYSING JADHAV

Digitally signed by VIJAYKUMAR JAYSING JADHAV
Date: 2026.07.21 17:10:15 +0530

नागपूर.

(व्ही.जे.जाधव)

दिनांक : २१.०७.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
महानगरपालिका न्या.क्र.२, नागपूर.